दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १४५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१९ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पुढील महिन्यात लहान मुलांसाठी कोरोना लस येणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**कोरोना व्हायरसच्या तिसऱ्या लाटेपूर्वी भारतासाठी आनंदाची बातमी आली आहे. भारतातच लवकरच लहान मुलांच्या लसीकरणाला सुरुवात होऊ शकते. आयसीएमआर-एनआयवीच्या संचालिका प्रिया अब्राहम यांनी २ ते १८ वयोगटातील लहान मुलांच्या कोव्हॅक्सिन फेज २ आणि फेज ३ ची चाचणी झाली असून भारतात सप्टेंबर महिन्यापर्यंत लहान मुलांसाठी स्वदेशी कोरोना लस येऊ शकते असं म्हटलं आहे.**

प्रिया अब्राहम यांनी एका चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत म्हटलंय की, अपेक्षा आहे की या चाचणीचे निष्कर्ष लवकरच उपलब्ध होतील. त्यानंतर नियामक आयोगाला पुढील परवानगीसाठी पाठवण्यात येईल. सप्टेंबर किंवा त्याच्या पुढील महिन्यापर्यंत लहान मुलांना कोविड १९ लस उपलब्ध होऊ शकते. आयसीएमआर आणि हैदराबाद येथील लस उत्पादक कंपनी भारत बायोटेक लहान मुलांसाठी पहिली स्वदेशी कोविड १९ लस बनवत आहेत.

अलीकडेच काही दिवसांपूर्वी सीरम इंस्टिट्यूट ऑफ इंडियाचे सीईओ अदार पूनावाला यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या मुलाखतीनंतर अदार पूनावाला यांनी म्हटलं की, सीरमची Covavax ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत भारतात लॉन्च होणार आहे. ही लस १२ वर्षावरील मुलांसाठी असेल. तसेच पुढील २०२२ च्या पहिल्या तिमाहीमध्ये १२ वर्षांपेक्षा कमी वयातील मुलांसाठी लस लॉन्च होईल. भारत सरकार पूर्ण सहकार्य करत असून कुठेही आर्थिक तुटीची शक्यता नाही असं त्यांनी सांगितले होते.

## आयसीएमआरची महत्वपूर्ण माहिती



तर लसीच्या वाटपावरुन सांगितले की, आम्ही १३ कोटी कोविड लसी प्रत्येक महिन्याला देत आहोत. सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने २ ते १७ वर्षापर्यंत मुलांवर कोवोवॅक्स लसीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील चाचणीसाठी काही अटींसह परवानगी देण्याची शिफारस केली आहे. माहितीनुसार चाचणीत १० ठिकाणी २९० लहान मुलांचा समावेश करण्यात येईल. ज्यात १२ ते १७ वयोगटातील आणि आणि २ ते ११ वयोगटातील प्रत्येकी ४६० विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

## ऑक्टोबरपासून लहान मुलांचे लसीकरण सुरु

सध्या १८ वर्षावरील लोकांच्या लसीकरणाचा कार्यक्रम सुरु आहे. लहान मुलं कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत जास्त संक्रमित होण्याचा धोका आहे. त्यामुळे जगभरात लहान मुलांसाठी लसीची चाचणी घेतली जात आहे. अमेरिकेत फायजर कंपनीने १२ वर्षावरील मुलांसाठी लसीची चाचणी सुरु केली आहे. भारतात बायोटेक कंपनीची कोव्हॅक्सिनची लहान मुलांवर चाचणी सुरु आहे. या चाचणीचे सकारात्मक निष्कर्ष समोर येत आहेत. तिसऱ्या लाटेचा परिणाम लहान मुलांवर होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. लहान मुलांसाठी लस लवकरात लवकर आणण्यासाठी युद्धास्तरावर प्रयत्न सुरु आहेत. लस आल्यानंतर त्याचे उत्पादन आणि वितरण जास्तीत जास्त कसं केले जाईल याबाबत वेगाने योजनांची तयारी केली जात आहे.

### तालिबानचा रक्तपात सुरू...

# अफगाण सैन्यातील ४ कमांडरची खुलेआम हत्या



**काबुल : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानवर कब्जा केल्यानंतर तालिबानने मंगळवारी पत्रकार परिषद घेत सूड घेणार नाही आणि सर्वांना माफ केल्याचं म्हटलं. पण दुसऱ्याच दिवशी तालिबानने रक्तपात सुरू केला आहे. तालिबानच्या सत्तेला विरोध करणाऱ्या काही अफगाण नागरिकांनी अफगाणिस्तानचा झेंडा फडकवला. तसंच हा झेंडा घेऊन त्यांनी रॅली काढली. तालिबान्यांना हे अजिबात सहन झालं नाही. त्यांनी निशस्त्र अफगाण नागरिकांवर बेछुट गोळीबार केला. या गोळीबात तीन नागरिक ठार झाले. तसंच काही पत्रकारही जखमी झाले. यात बहुतेककरून व्हिडिओ जर्नलिस्ट आहेत, असं वृत्त रॉयटर्सने दिलं आहे.

जलालाबाद हे अफगाणिस्तानमधील मोठे आणि मुख्य शहर आहे. या शहरातील एका मुख्य चौकात बुधवारी हजारो अफगाण नागरिक जमा झाले. त्यांनी एका ठिकाणी अफगाणिस्तानचा राष्ट्रध्वज फडकवला. यानंतर त्यानी मुख्य मार्गावरून रॅली काढली. हे बघून रस्त्यावर तैनात असलेल्या तालिबान्यांनी जमावाला पांगवण्यासाठी गोळीबार केला. यात तीन नागरिक ठार तर काहीजण जखमी झाले.

तालिबानने महिलांना सुरक्षा आणि त्यांचे अधिकार देण्याचं आश्वासन दिलं आहे. पण तालिबानने हे फक्त जगात आपली प्रतिमा चमकवण्यासाठी केल्याचं बोललं जात आहे, असं वृत्त न्यूयॉर्क टाइम्सने दिलं आहे. काबुल विमानतळाबाहेर महिलांना मारहाण केली गेली. एका महिलेला बंदुकीच्या बटने मारतानाचा एक फोटोही समोर आला आहे.

# पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या अपघातात २ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात २ ठार १ जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल जवळील जेएनपीटी मार्गावरील बंबावी पाडा येथील साई विभुती ढाब्यासमोर आज सकाळी एका ट्रेलरने त्याच्या पुढे चाललेल्या होंडा डिओ स्कुटी गाडीस पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात फिर्यादी निलेश कमल सिंग (२५) हा जखमी झाला आहे तर त्याचा सहकारी अक्षय घोले (२५) हा गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत पनवेल शहरातील मालधक्का रोड येथून पायी जात असलेल्या मुंबई दलात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत असणारे शिवाजी सानप यांना एका अज्ञात वाहनाची धडक बसून ते गंभीररित्या जखमी झाले.

त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले असता तेथे त्यांचा मृत्यू झाला आहे. या दोन्ही अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात करोनाची दैनंदिन रुग्णसंख्या वाढली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज दैनंदिन रुग्णसंख्येत कालच्या तुलनेत वाढ झाली असून मृत्यूंच्या संख्याही ४२ ने वाढली आहे. तसेच, आज बरे होणाऱ्या रुग्णाची संख्या वाढली असून हा त्यातल्यात्यात दिलासा आहे. असे असले तरी राज्यातील एकूण सक्रिय रुग्णांच्या संख्येत मात्र घट झाली आहे. राज्यात आज दिवसभरात एकूण १५८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तसेच आज दिवसभरात ५ हजार १३२ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. तसेच आज एकूण ८ हजार १९६ इतके रुग्ण बरे झाले आहेत. आज राज्यात झालेल्या १५८ रुग्णांच्या मृत्यूंनंतरही राज्याचा मृत्यूदर मात्र २.११ टक्क्यांवरच आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६२ लाख ०९ हजार ३६४ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.९३ टक्के इतके झाले आहे.

# तहसीलदारांच्या विशेष पथकाने बेकायदेशीर वाळू साठा केला हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**



तालुक्यातील देहरंग धरणाच्या दोधाणी नदीच्या पात्र परिसरात अवैद्धरित्या वाळू उत्कखनन करून वाळूचा साठा करण्यात येत असल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने टाकलेल्या छाप्यात बेकायदेशीर वाळू साठा ताब्यात घेण्यात आला असून अज्ञात व्यक्तीविरूद्ध पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पनवेल परिसरात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात अवैद्धरित्या वाळूचा उपसा व साठा करून त्याची विक्री शासनाचे नियम मोडून छुप्या पद्धतीने होत असल्याचे अनेक तक्रारी पनवेल तहसील कार्यालयात येत असतात. अशाच प्रकारे देहरंग धरणाच्या दोधाणी नदीच्या पात्र परिसरात अवैद्धरित्या वाळू उत्कखनन करून वाळूचा साठा करण्यात येत असल्याची माहिती तहसील कार्यालयाला मिळताच त्याठिकाणी तलाठी पोलिस पाटील व इतर पथकांनी जाऊन तेथून दोन ते अडिच ब्रास वाळू ज्याची किंमत जवळपास ७ हजार ५०० इतकी आहे. हि त्याठिकाणी मिळून आली आहे. त्यासंदर्भात अज्ञात व्यक्तीविरूद्ध पनवेल तालुका पोलिस ठाण्यात खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम १९५७चे कलम १५ व २१ अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.


# पनवेलमधील बिल्डरला तरुणीने लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**सोशल मिडीयाव्दारे विशेषतः फेसबुकवर हनी ट्रॅपचे प्रकार वाढु लागले असल्याने अनोळखी सुंदरीच्या मोहजाळात फसू नका असे आवाहन वारंवार पोलिसांच्या सायबर सेल विभागाकडून केले जाते. मात्र त्यानंतरही या आवाहनाकडे दुर्लक्ष होत असल्याने आजमितीस यात अनेक जण अडकण्याचे प्रकार होतांना दिसत आहेत. याबाबत काही जण तोंडी तक्रारी करतात तर काही जण बदनामीपोटी तक्रारी करण्यासाठी पुढे येत नसल्याचे चित्र आहे.**

अवैध कमाईचे साधन कोण कुठून आणि कसे शोधून काढेल याचा काहीच अंदाज नाही. आजमितीस इंटरनेट आणि सोशल मिडीयाच्या आहारी गेलेले अनेक जण अशा प्रकारांना बळी पडतांना दिसतात. यात पुरुषच नाही तर महिलाही बळी ठरत असून या माध्यमातून ब्लॅकमेल करून पैसा कमावण्याचा गोरखधंदा केला जात आहे. पनवेल येथील एका तरुण बांधकाम व्यावसायिकालाही सोशल मीडियावर एका तरुणीशी झालेली ओळख चांगलीच अंगलट आली असून हनी ट्रॅपमध्ये अडकलेल्या या व्यावसायिकाला लाखो रूपये गमवावे लागले आहेत.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर कोंढवा पोलिसांनी तरुणीसह सहा जणांच्या टोळीला अटक करत बेड्या ठोकल्या आहेत. यात रविंद्र भगवान बदर (२६), सचिन भातुलकर, आण्णा साळुंके (४०), अमोल ढवळे (३२), मंथन शिवाजी पवार



(२४) आणि १९ वर्षीय तरुणी यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे कोंढवा पोलिसांनी अटक केलेली तरूणी ही केवळ नववी पास आहे.

मात्र असे असले तरी सोशल मिडीयाचा वापर करण्यात सदरची तरुणी चांगलीच पटाईत असल्याचे पोलिस तपासातून निष्पन्न झाले आहे.

तिचा पती खूनाच्या गुन्ह्यात कारागृहात शिक्षा भोगतोय. पती कारागृहात गेल्यावर पतीच्या गुन्हेगार मित्रासोबत तिची ओळख झाली अन् यातूनच हनीट्रॅप करणाऱ्या नव्या टोळीचा उदय होवून तीही या टोळीची सदस्य बनली. यात पुढे अनेकजण या टोळीचे सावज सुद्धा झाले. कोणी अब्रूला घाबरुन तर कोणी भीतीपोटी त्यांना पैसे देत पोलिसात जाण्याचे टाळले. मात्र चार दिवसांपूर्वी मुंबईच्या एका व्यवसायिकाने पोलिसात जाण्याचे धाडस केले. अन् अवघ्या ७२ तासांच्या आत पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर कापुरे आणि त्यांच्या पथकाने हनीट्रॅप करणारी ही टोळी गजाआड केली. या टोळीने पनवेल येथील ३१ वर्षीय व्यावसायिकाला मारहाण करत खंडणी उकळली होती. या घटनेंतर व्यावसायिकाने पोलिसात धाव घेतल्यानंतर पोलिसांनी तपास करून या टोळीला जेरबंद केले.

### तालुका क्रीडा संकुलात पैलवांनाना तालमीसाठी आखाडा तयार करून

# पैलवानांची होणारी गैरसोय दूर करावी : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील तालुका क्रीडा संकुलात पैलावांना तालमीसाठी आखाडा तयार करून पैलवानांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पनवेल तालुक्याला कुस्तीगिरांची परंपरा लाभली आहे. तालुक्यातील ग्रामीण भागातील तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शहरात सरकारी तसेच खाजगी आस्थापनांमध्ये कार्यरत असणारे अनेक पैलवान आहेत. मात्र स्थानिक पातळीवर तालमीसाठी जागा/आखाडा नसल्याने यातील पैलवानांची गैरसोय होत आहे. अनेकजण सांगली व कोल्हापूर येथील तालमीत जाऊन सराव करतात. त्यामुळे आपल्या अखत्यारीत असणाऱ्या तालुका क्रीडा संकुलात पैलावांना तालमीसाठी आखाडा तयार करून पैलवाणांची होणारी गैरसोय दूर करण्यात यावी असे निवेदन पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी तहसीलदार विजय तलेकर यांच्याकडे दिले आहे.

पनवेलच्या ग्रामीण भागात अजूनही कुस्ती शौकिनांची संख्या मोठी आहे. कुस्तीतून अनेक चांगले खेळाडू तयार होत आहेत. या कुस्तीगिरांना पालकांचे देखील मोठे पाठबळ मिळत आहे. कुस्तीच्या खेळाला प्रेक्षकांचा देखील मोठा प्रतिसाद मिळतो.

कुस्तीगिरांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सांगितले आहे.

# ना.एकनाथ शिंदे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–



गुरुवार दि.१९ ऑगस्ट २०२१ रोजी दुपारी १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथून मोटारीने विराज कंपनी हेलिपॅड, पालघरकडे प्रयाण. दुपारी १.४५ वा. विराज कंपनी हेलिपॅड येथे आगमन व तेथून हेलिकॉप्टरने ता.महाड, जि.रायगडकडे प्रयाण. दुपारी २.४५ वा. एमआयडीसी हेलिपॅड महाड येथे आगमन व तेथून एमआयडीसी महाडकडे प्रयाण. दुपारी ३.०० ते ४.०० एमआयडीसी महाड येथे रायगड जिल्ह्यातील महाड येथे नुकत्याच झालेल्या पूरपरिस्थितीचा आढावा बैठक. सायं.४.१५ वा. एमआयडीसी हेलिपॅड महाड येथून हेलिकॉप्टरने ठाणेकडे प्रयाण.

### परेश ठाकूर यांच्या सुचनेनुसार

# उड्डाणपुलावरील खड्डे दुरुस्ती कामाला सुरुवात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पनवेल येथील महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलावरील खड्डे दुरुस्त करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या.

पनवेल शहरातून जाणाऱ्या उड्डाणपुलावर खड्डे पडल्याने वाहनचालक व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. सदरची बाब लक्षात आल्याने शहर अभियंता संजय कटेकर यांच्यासोबत उड्डाणपुलावर सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पाहणी केली. खड्ड्यांमुळे अपघात होऊ नये याची दक्षता घेत सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत यांनी संजय कटेकर यांना त्या संदर्भातील सूचना केल्या. यावेळी भाजपचे उमेश इनामदार, मोतीराम कोळी, पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी साळुंके तसेच टी.आय.पी.एल कंपनीचे इंजिनियर संतोष कडू उपस्थित होते.

# विद्यार्थी वाऱ्यावर

सर्व शक्यतांचा विचार न करता निर्णय घेतल्यास परिणाम काय होतात, याचा अनुभव राज्यातील विद्यार्थी गेल्या वर्षभरापासून घेत आहेत. करोना साथरोगाच्या संकटात ऑनलाइन वर्गांमुळे शिक्षणाची प्रक्रिया कशीबशी सुरू असली, तरी या साऱ्याच्या केंद्रस्थानी असलेल्या विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान कधीही भरून येणारे नाही. विद्यार्थिकेंद्री शिक्षणाच्या नावाखाली घेतल्या गेलेल्या अनेक निर्णयांचा फटका खुद्द विद्यार्थ्यांनाच बसतो आहे. अकरावी प्रवेशासाठी वेगळी परीक्षा (सीईटी) घेण्याचा राज्य सरकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केल्याने जो गोंधळ निर्माण झाला, त्याला राज्य सरकारच जबाबदार आहे. 'न्यायालयाने निवाडा दिला, त्याला आम्ही काय करणार,' असा युक्तिवाद करीत सरकारला जबाबदारी झटकता येणार नाही. आपल्या निर्णयाचे संभाव्य परिणाम काय असू शकतात, कोणाला त्याचा फटका बसू शकतो, घटनात्मक चौकटीचे किंवा नियमांचे उल्लंघन तर होत नाही ना, आदी बाबींचा विचार करून निर्णय घेतले गेले असते, तर ही वेळ आली नसती. एक निर्णय घ्यायचा, तो राबवायचा आणि त्यातील दोष दिसल्यानंतर दुसरा निर्णय, असा प्रकार सुरू आहे. दहावीची परीक्षा रद्द करण्यापासून अकरावीची 'सीईटी' घेण्यापर्यंत नेमके हेच झाले आहे; त्यामुळे या 'सीईटी'च्या नियमांमागील तर्कसंगती सरकारला न्यायालयाला पटवून सांगता आली नाही. राज्य मंडळाच्या (एसएससी बोर्ड) अभ्यासक्रमावर आधारलेल्या या 'सीईटी'त अन्य बोर्डांचे विद्यार्थी कसे चांगले गुण मिळविणार, हा प्रश्न सुरुवातीलाच उपस्थित झाला होता. तोच उचलून धरत न्यायालयाने राज्य सरकारचा निर्णय 'जुलमी', 'लहरी', 'कठोर' आणि 'बेकायदा'ही ठरविला. हा निवाडा देताना उच्च न्यायालयाने नोंदविलेल्या निरीक्षणांचा सरकारने गंभीर विचार करायला हवा. अकरावीसाठी 'सीईटी' घेण्याचा निर्णय सदोष आणि विसंगतींनी भरलेला होता. करोनामुळे दहावीची बोर्ड परीक्षा रद्द करावी लागली होती. अजूनही करोना असताना आणि बरेच निर्बंध कायम असताना 'सीईटी' घेणे, म्हणजे परीक्षा रद्द करण्याच्या मूळ निर्णयाला छेद देणे होते. 'सीईटी' घेतली जाते, तर मग दहावीची परीक्षा का घेतली गेली नाही, असा प्रश्नही यामुळे उपस्थित होत होता. दुसरी विसंगती म्हणजे, 'सीईटी' ऐच्छिक ठेवली गेली; परंतु अकरावी प्रवेशासाठी ती देणाऱ्यांना प्राधान्य असणार होते. मग 'सीईटी' ऐच्छिक ठेवण्याला अर्थ काय? म्हणूनच 'सीईटी'साठी मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली. या 'सीईटी'साठी राज्य मंडळाचा अभ्यासक्रम विचारात घेतला गेला. 'सीबीएसई', 'आयसीएसई' आदी अन्य परीक्षा मंडळे आणि राज्य मंडळ यांचे अभ्यासक्रम वेगळे आहेत. एकसमान अभ्यासक्रम नसणे, हा या 'सीईटी'तील ठळक दोष होता. हा विचार धोरणकर्त्यांनी आधी करायला हवा होता. 'सीईटी' प्रक्रियेतील या बाबींवर आक्षेप घेतले जाऊ शकतात आणि न्यायालयात आव्हान मिळू शकते, याची जाणीवही असायला हवी होती. ती असती, तर कदाचित दोष दूर करण्याचे प्रयत्न झाले असते; किंवा 'सीईटी' घेण्याचा निर्णयच झाला नसता. दहावीच्या मूल्यमापनाबाबतही शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच सरकारने धोरण निश्चित केले नाही. करोनाची साथ इतक्यात संपणार नाही हे ओळखून, संपूर्ण वर्षभर पारदर्शक पद्धतीने अंतर्गत मूल्यमापन झाले असते, तर हा प्रश्नच आला नसता. नववीतील गुण आणि दहावीच्या अंतर्गत परीक्षांमधील गुण यांद्वारे मूल्यमापन करून राज्य मंडळाने निकाल जाहीर केला. त्यावरच अकरावीचे प्रवेश करणे उचित ठरले असते; परंतु दहावीच्या मूल्यमापनावर काहींनी प्रश्न उपस्थित केल्याने 'सीईटी'चा मार्ग सुचला असावा. या सदोष धोरणाचा फटका विद्यार्थ्यांना बसतो आहे. दहावीच्या परीक्षेची तयारी त्यांनी केली होती; परंतु परीक्षा रद्द झाली. आता 'सीईटी'चीही तयारी त्यांनी केली होती. तिचाही प्रवेशासाठी उपयोग होणार नाही. अकरावीची प्रवेश प्रक्रिया दीड महिन्यात संपविण्याचा आदेश न्यायालयाने दिला असला, तरी आजवरचा अनुभव पाहता मुंबई, पुणे आदी महानगरांत या काळात सर्वांना प्रवेश मिळतील काय, याबाबत शंका आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाशी होत असलेला हा खेळ थांबायला हवा. यंदा दहावीला असणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षी असा त्रास होणार नाही, याची काळजी आजच घ्यायला हवी. त्यांच्या निरंतर अंतर्गत मूल्यमापनाची पद्धत जाहीर करायला हवी. करोनाची साथ असणार हे गृहीत धरून बोर्ड परीक्षा कशा घेता येतील, याचा विचार हवा. पदवी परीक्षांसाठी विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षांची पद्धत विकसित केली. त्यात त्रुटी असल्या, तरी त्या दूर करून तशा परीक्षा दहावी-बारावीसाठी घेता येतील का, हे पाहायला हवे. गेल्या सव्वा वर्षात झालेल्या चुकांपासून धडा न घेणे याचा अर्थ विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडणे, असा होतो.

# हुतात्मा हिरवे गुरुजी समाज भूषण पुरस्कार वितरण सोहळा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नामदेव शिंपी समाज युवक संघ, महाराष्ट्र आयोजित हुतात्मा हिरवे गुरुजी समाजभूषण पुरस्कार पनवेल येथील हुतात्मा हिरवे गुरुजी स्मारक येथे मान्यवरांच्या उपस्थीतीत पार पडला. या वर्षी या पुरस्कारासाठी नामदेव शिंपी समाज युवक संघाने प्रसिद्ध चित्रकार व शिल्पकार अशोक काळे यांची निवड केली होती.

नामदेव शिंपी समाज युवक संघातर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. यंदाचे पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. हा पुरस्कार चालू करण्यामागे हेतू म्हणजे समाजातील युवकांना क्रांतिकारकांचे कार्य माहित व्हावे व देशाप्रती आत्मीयता प्रेम वाढीस लागावी तसेच समाजाचे प्रती त्यांचा इतिहास युवकांपुढे यावा हा आहे. पहिला पुरस्कार संत नामदेव महाराज यांचे थेट १७ वे वंशज ह भ प निवृत्ती महाराज नामदास यांना देण्यात आला होता तर दुसऱ्या वर्षीचा पुरस्कार मागील वर्षी ऑनलाइन कार्यक्रमात भारतीय संशोधक शास्त्रज्ञ प्रसन्नजी वायचळ यांना देण्यात आला होता.

अशोक काळे यांना युवक संघाचे अध्यक्ष सिध्देश हिरवे यांनी शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सर्व मान्यवरांचे साक्षीने पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सत्कारानंतर आपले मनोगत व्यक्त करताना अशोक काळे भावुक होऊन यांनी आपल्या जिवनातील संघर्ष व कलेतुन ते कसे यशस्वी झाले याबाबत सांगितले. यानंतर नामदेव शिंपी समाज युवक संघाचे नुकतेच स्थापन झालेले युवकांसाठी उद्योग मार्गदर्शक मंडळ याचे उद्दीष्ट व पुढील वाटचाल याबाबत निलेश बोंगाळे यांनी माहिती दिली.

यानंतर प्रितमजी लचके यांनी उद्योग मार्गदर्शक मंडळाची कार्यकारिणी जाहीर केली.

या पुरस्कार सोहळ्याला प्रविण गंगावणे, नागेश हिरवे, आनंद मेटे, विरेश नांगरे, रविंद्र कालेकर, संदिप शिंत्रे, रायगड जिल्हा शिंपी समाज महासंघाचे खजिनदार मनीषा शिंत्रे, दिलवेद माळवदे, प्रितम लचके, शशांक हिरवे, योगा प्रशिक्षक संजय खांबेकर, सुनीलकुमार पोरे, पनवेलचे स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी सुरेंद्रनाथ गोडबोले, हुतात्मा हिरवे गुरुजी यांच्या सुनबाई अरुणा हिरवे, नातसून हेमलता हिरवे हे सर्व मांन्यवर उपस्थित होते.

# आझाद समाज पार्टी (महिला मोर्चा) च्या महिला आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलांवरील अत्याचाऱ्याच्या विरोधात पनवेल येथे ASP च्या माध्यमातून आक्रोश आंदोलन करण्यात आले.



शहरांमध्ये महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना महिला कुठेही सुरक्षित राहिली नाही. गाव आणि जिल्हा पातळीवर महिलांच्या सक्षमीकरणासाठी मेळावे आणि शिबिर आयोजित करून जनजागृती केली जात असली तरी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नस गंभीर होत आहे. महिलांवरील अत्याचार, शाळा, महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींची छेडछाड करून विनयभंग करणे, लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे, पुरुषांकडून महिलेस मारहाण अशा घटनामध्ये गेल्या काही दिवसात वाढ होताना दिसत आहे. महिला – मुली तरु–णीवर अन्याय अत्याचार करणाऱ्या अश्या नराधमांनावर वचक बसण्याकरिता आझाद समाज पार्टी महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा नेहाताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुका अध्यक्षा रूपालीताई शिंदे यांच्या वतीने पनवेल तहसील कार्यालय येथे जोरदार आक्रोश आंदोलन करण्यात आले, मुसळधार पाऊस असताना देखील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रूपालीताई शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की काहीही झाले तरी महिलांच्या न्याय हक्कासाठी नेहमी झगडणार, महिलेवर अत्याचार झाला तर आम्ही सहन करणार नाही आज आम्ही शांततेत आंदोलन केले भर पावसात मात्र लाखोंच्या संख्येने येण्यास आम्हला भाग पाडू नका, गेल्या काही महिन्यात महिलांवर अत्याचार विनय भंग ,बलात्कार व महिलेस पुरुषांन कडून मारहान झाली ह्यांचे तक्रार पोलीस ठाण्यात दाखल आहेत व आरोपी मोकाट आहे १ महिन्यात जर ह्या सगळ्या केस मार्गी नाही लावल्या तर आम्ही महिलांच्या सुरक्षिततेसाठी तीव्र आंदोलन करू. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा नेहाताई शिंदे यांनी केंद्र सरकार व गुन्हा नोंद करताना पोलिस प्रशासनाची दिरंगाई यावर जोरदार प्रहार करत सांगितले की आम्ही संविधानाला मानणारे आहोत. कायद्याचे उल्लंघन करत नाही याचा अर्थ असा नाही की आम्ही दबावाला घाबरतो. जर केंद्र सरकार आणि पोलिस प्रशासन दखल घेत नसेल तर आम्ही महाराष्ट्र भर आक्रोश आंदोलनाची भिंत उभी करू. आजाद समाज पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ॲड. भाई चंद्रशेखर आजाद यांचा आंदोलनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात महिलांसाठी आजाद समाज पार्टी महिला मोर्चा च्या वतीने रस्त्यावर उतरू.

जोरदार निदर्शनांनंतर तहसिलार साहेब आणि डीसीपी साहेब यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनासाठी आजाद समाज पार्टी महाराष्ट्र अध्यक्षा मा. नेहाताई शिंदे, कोषाध्यक्षा राजश्रीताई अहिरे, रायगड जिल्हा संघटक जयश्रीताई पाटील, पनवेल तालुका अध्यक्षा रूपालीताई शिंदे, साईनगर विभाग अध्यक्षा विद्याताई जाधव, कळंबोली शहर उपाध्यक्षा संगीताताई कांबळे, नेरूळ शहर अध्यक्षा प्रमिला खंडागळे, श्रीमती. स्नेहा धुमाळ सौ.किरण अडागळे सौ. रत्नमाला पाबरेकर कु. प्रणाली नाईक, सौ. रुपाली सनस, कु.गार्गी गडगे, सौ. प्रणाली गडगे, वरिष्ठ कार्यकर्ते मा. सुदेश शिंदे सर, सुधीर वर्गट, चेतन साळवे, प्रकाश सोन–वणे, दानिश शहा, प्रतिक मोहोड, विकी थोरात, तसेच अन्याय अत्याचार निर्मूलन समिती चे कोकण प्रदेश प्रमूख संतोष चाळके, यश झवर व अनेक बंधू– भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तत्परतेने झपाट्याने सर्वसामान्य नागरिकांची कामे करणारे नगरसेवक राजु सोनी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेतील अतीशय हीरहीरीने सर्व सामान्य नागरीकांची कामे अगदी चुटकीसरशी करणारे नगरसेवक म्हणुन ख्याती असणारे राजु सोनी हे पनवेल मध्ये सुपरीचीत आहेत.

पनवेल महानगरपालिका हद्दीत हा माझा वार्ड आहे मी फक्त माझ्याच वार्ड मधील नागरीकांचीच कामे करीन हा इगो न बाळगता पनवेल मधील विविध वार्ड मधील सर्व सामान्य नागरीकांच्या गळयातील ताईत बनलेले आपल्या हक्काचे नगरसेवक म्हणुन विविध विभागातील नागरीक राजु सोनी यांना फोन करीत असतात महत्वाची बाब म्हणजे ते दुसरी फोन ची रींग वाजायच्या आतच ते आपला फोन घेऊन समोरच्या बोलणारी व्यक्तीची समस्या अगदी हीरहीरिने आस्तेने समजुन घेऊन तात्काळ सांगीतलेले कामे तडीस नेतात पनवेल महानगरपालिका हद्दीतील कोळीवाडा, बागवान मोहल्ला, वाणी आळी, मिरची गल्ली, कापड बाजार,भाजी मार्केट, जव्हेरी बाजार, अशा अनेक विभागातील (आळ्या ) अशा परीसरातील व्यापारी छोटे मोठे व्यावसाईक किरकोळ विक्रेते यांच्या बहुतांश समस्या सोडविण्यासाठी राजु सोनी सदैव अग्रेसर असतात विविध विभागातील लाईटचा प्रश्न असो गटारावरील झाकणे असो,कुणाच्या ड्रेनेजच्या समस्या अथवा नागरी समस्या असोत राजु सोनी यांना एक फोन करताच त्या समस्येचे निवारण होत असते नुकतेच मिरची गल्ली विभागातील महानगरपालिका अखत्यारीत असणारी रस्त्यावरची स्ट्रीट लाईट रात्री सदर ठिकाणी रात्री अंधारामुळे नागरीकांना रहदारी करीता समस्या जाणवीत होती तसेच या अंधाराचा फायदा घेऊन भुरट्या चोरीचे प्रकारही सदर परीसरात झाले होते तेथील समस्या काही नागरीकांनी त्यांना फोनवरून सांगताच सोनी यांनी महानगरपालिकेत विद्युत विभागात त्वरीत संपर्क साधुन आज स्ट्रीट लाईट त्वरीत बसविल्याने येथील नागरिकांनी नगरसेवक असवा तर राजु सोनी सारखा अशा स्वरूपाच्या भावना प्रती समाधान व्यक्त केले.

---

श्री.भाकरे सो. कोर्ट

ॲड.प्रिती बनकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.९०२/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२९/०९/२०२१

श्री.दिपक विठ्ठल सोनवणे व इतर ४ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री.विठ्ठल फकीरा सोनवणे यांचे दि.१२/०४/२०२१ रोजी डॉ.डी.वाय. पाटील हॉस्पिटल येथे निधन झाले असून व सद मयत श्री.विठ्ठल फकीरा सोनवणे यांच्या खालील नमूद मालकीच्या मिळकती संदर्भात मयत विठ्ठल फकीरा सोनवणे, यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे परिशिष्ट**

**फ्लॅट नं.३०२, तिसरा मजला, महाविर दर्पण, प्लॉट नं.१०६, सेक्टर १९, उलवे, नवी मुंबई-४१०२०६ मिळकतीचे (५०%) मालक ज्याची किंमत एकूण रक्कम रु.... /- एवढी आहे.**

त्याअर्थी सदर अर्जदार यास त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१८ ऑगस्ट माहे २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिलेले आहे.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

श्री.भाकरे सो. कोर्ट

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट ॲड.उदय प्र. मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८२२/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२२/०९/२०२१

(कै.सुनील सर्जेराव मोरे यांचे कायदेशीर वारस)
१) कुमारी.ऐश्वर्या सुनील मोरे (मुलगी)
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
२) कुमारी.रुतुजा सुनील मोरे (मुलगी)
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्रीमती.मिना सुनील मोरे (पत्नी)
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार १ ते ३ रा.अे/२/३०२,
अंबिका पार्क, खांदा कॉलनी, प्लॉट नं.१,
सेक्टर नं.६, नवीन पनवेल (पश्चिम) पनवेल-४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. सुनील सर्जेराव मोरे यांचे निधन दि.३०/०८/२०२० रोजी कामोठे येथील एम.जी.एम. हॉस्पिटलमध्ये झालेले आहे.

कै.सुनील सर्जेराव मोरे यांच्या मृत्यू पश्चात वरील पैकी अर्जदार हे कै. सुनील सर्जेराव मोरे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.सुनील सर्जेराव मोरे यांनी खांदा कॉलनी, पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित व्यावसायिक गाळा खरेदी केलेला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड**
**व्यावसायिक गाळा (दुकान) क्रं.१९**
**श्री.गणेश प्लाझा फेज : १**
**सेक्टर : ८, प्लॉट नं.१,**
**प्लॉट नं.१२,**
**क्षेत्रफळ : २४२ स्क्वे.फुट**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.सुनील सर्जेराव मोरे अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०८/२०२१

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.भाकरे साहेब

प्रो.जमा रु.५०/- अर्जदारातर्फे वकील ॲड.शुभांगी केदार लाड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०८०/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.११/१०/२०२१

कै.अरुणकुमार गजानन लाड मयत यांचे वारस
१) अनुराधा अरुणकुमार लाड
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.केदार अरुणकुमार लाड
वय : ४१ वर्षे, धंदा : काही नाही
अर्जदार क्र.१ व २ रा.बी.१०१,
रिद्धी सिद्धी को.ऑप.सो.,
स्वामी नित्यानंद मार्ग, ता.पनवेल, जि.रायगड
३) प्रियांका अरुणकुमार लाड उर्फ
लग्नानंतरची सौ.प्रियांका प्रसाद साखरे
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.३ रा.बी. विंग, रुम नं.२०६,
भूमी हारमोनी, प्लॉट नं.८२, मातोश्री हॉस्पिटल जवळ,
सेक्टर १८, कामोठे, कामोठे नोड, रायगड ४१०२१८ अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.अरुणकुमार गजानन लाड यांचा मृत्यू दि.११/०९/२०११ रोजी सहस्त्रबुद्धे रुग्णालय, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे झालेला असून कै.अरुणकुमार गजानन लाड हे हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे मालकी हक्कात स्वसंपादीत मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत आहे.

**निवासी मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील**

| मौजे | बिल्डींगचे / सोसायटीचे नाव | Flat No. निवासी सदनिका क्र. | Floor फ्लॅट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कामोठे | भूमी हारमोनी | २०६ | दुसरा | ७२.३६६ चौ.मी. |

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१८/०८/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

प्रोसेस जमा रु.५०/- ॲड.समाधान काशिद, कामोठे
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज क्र.६३२/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२६/०८/२०२१

श्री.सुभाष मारुती यमगर अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.सिंधू सुभाष यमगर हे दि.११/०५/२०२० रोजी आदर्श को.ऑ.हौसिं.सोसा., डी-१०, रुम नं.१०, सेक्टर नं.४८ ए, नेरुळ, सीवूड, नवी मुंबई येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**१) सदनिका क्रं.३०१, तिसरा मजला अधिक ४ मजला इमारत, अमर व्हीला, प्लॉट नं.१९, सेक्टर नं.११, कामोठे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड. त्याचे क्षेत्रफळ ३८.०१ चौ.मी. कारपेट**

**२) सदनिका क्रं.५०३, पाचवा मजला, सफायर, ए विंग, प्लॉट नं.३३ आणि ३४, सेक्टर नं.२२, कामोठे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड. त्याचे क्षेत्रफळ ३३.३५३ चौ.मी. बिल्टअप अधिक ३.८०५ चौ.मी. टेरेस**

**३) सदनिका क्रं.६०१, सहावा मजला, तपोवन हाईटस, प्लॉट नं.१०९, सेक्टर नं.९, उलवे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड. त्याचे क्षेत्रफळ ४५.४४७ चौ.मी. कारपेट अधिक सी बी अधिक एफ बी २०.९७९ चौ.मी.**

कै.सिंधू सुभाष यमगर यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार व सामनेवाले यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख १८/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अर्जदारांतर्फे वकील
श्री.किरण बा. भगत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०८९/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२७/०९/२०२१

१) श्रीमती.सुजाता बळीराम शिंदे
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.जागृती बळीराम शिंदे
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.साक्षी बळीराम शिंदे
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.मु.मोठा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी बळीराम लक्ष्मण शिंदे हे दि. बळीराम लक्ष्मण शिंदे रोजी मरण पावले असून त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे नावे तीन चाकी-तीन प्रवाशी वाहतुकीची ऑटो रिक्षा चालविणेच्या धंद्याकरिताचे परमिट आर.टी.ओ. पनवेल यांनी दिलेले आहे. सदर परमिटचा नं. P.CO.P.No. MH46/1522B2014 असा आहे. सदरचे परमिट हे आजमितीसही मयत बळीराम लक्ष्मण शिंदे यांचेच नावे असून त्याची वैधता दि.०६/०३/२०१९ पर्यंत होती. तरीही सदर परमिटचे नुतनीकरण करणे शक्य असून त्याप्रमाणे सदर अर्जदार नं.१ हिने सदर परमिटचे तिच्या नावाने नुतनीकरण करण्यासंबंधी संबंधित कार्यालयात महणजेच आर.टी.ओ. कार्यालयामध्ये चौकशी केली असता तिला सक्षम न्यायालयाकडून मयत बळीराम लक्ष्मण शिंदे यांचा वारस दाखला (Succession Certificate) आणणेस सांगितले. सबब अर्जदार नं.१ हिचे नांव सदरचे परमिट होणेचे दृष्टीने सदर अर्जदार हे मयत बळीराम लक्ष्मण शिंदे यांच वारस असलेबाबतचा वारस दाखला (Succession Certificate) मिळणेकरिता अर्जदारांनी सदरचा अर्ज या ना.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला (Succession Certificate) देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला (Succession Certificate) दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१८ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सही व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## चिरनेर येथे डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते राऊत क्लिनिकचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर येथील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सूरदास राऊत यांचे सुपुत्र व्हनुज सूरदास राऊत यांनी सुरू केलेल्या राऊत क्लिनिकचे उद्धघाटन पनवेल येथील नामांकित डॉक्टर गिरीश गुणे यांच्या हस्ते नुकतेच चिरनेर येथे करण्यात आले.

दिवसेंदिवस वातावरणात सातत्याने बदल घडत असल्यामुळे याचा विपरीत परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आजाराचे प्रमाण देखील वाढत आहे. गावात लोकांची संख्या ही खूप वाढली आहे. त्यामुळे दवाखान्याची गरच भासत होती. ही गरज राऊत क्लिनिकच्या माध्यमातून पूर्ण झाली आहे. यामुळे गावकऱ्यांना चांगला दिलासा मिळाला आहे. या उद्धघाटन प्रसंगी लहान मुलांचे वैद्यकीय अधिकारी राजेश पाटील सरपंच संतोष चिर्लेकर उपसरपंच प्रियांका गोंधळी प्रा.घनश्याम पाटील शाळेचे व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी चिरनेर व कळंबुसरे येथील बहुतांशी नागरिक या उद्धाटन प्रसंगी उपस्थित होते.

# घोट गाव येथे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्र सुरु करा

## सभागृहनेते परेश ठाकूर यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील घोट गाव येथिल रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नव्याने कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्र सुरु करण्यात यावे, अशी मागणी पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.

सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल महानगरपालिका हद्दीतील घोट गाव, सिद्धी करवले, कोयनावळे, तुर्भे व आजूबाजूच्या गावांमधील नागरीकांची वाढती लोकसंख्या पाहता गावातील नागरीकांना कोविड लसीकरण केंद्र उपलब्ध नसल्याने घोट गावातील व आजुबाजूच्या गावातील नागरीकांना लसीकरणाकरीता पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली व खारघर अशा शहरात लसीकरण करण्याकरीता जावे लागते. त्यामुळे त्या ठिकाणी प्रचंड प्रमाणात गर्दी होऊन लसीकरण करण्याकरीता येणाऱ्या महिला वर्ग तसेच जेष्ठ नागरीकांना टोकन घेण्याकरीता तात्कळत रांगेत उभे राहवे लागते. त्यामुळे गावातील महिला व जेष्ठ नागरीकांना मोठ्याप्रमाणात नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने घोट गाव व आजुबाजूच्या गावातील रहिवाशी घोट गाव येथिल रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लसीकरण केंद्राची उभारणी करण्याकरीता सातत्याने मागणी करीत आहेत.



त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका प्रशासनामार्फत घोट गावातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नव्याने लसीकरण केंद्राची उभारणी करावी व त्यासंदर्भातील निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दयावेत, असेही निवेदनात अधोरेखित केले आहे.

# बॅग घेऊन पळणाऱ्या चोरट्याला नागरिकांनी पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**


महिलेजवळ असलेल्या बॅगेमध्ये विंचु असल्याचे सांगुन तिची बॅग घेऊन पळून जाण्याच्या बेतात असलेल्या चोरट्याला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना सोमवारी दुपारी पनवेलमध्ये घडली. अमित अशोक नेरकर (३०) असे या चोरटय़ाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

या घटनेतील तक्रारदार रंजना लांघे (४८) या पनवेलच्या डेरवली भागात राहण्यास असून सोमवारी दुपारी त्या कामानिमित्त पनवेलमध्ये आल्या होत्या. यावेळी त्यांच्यासोबत शितल पवार व मुमताज शहा या देखील होत्या. या तिघी पनवेल मधील यशोनारायण कॉम्पलेक्सजवळ राहणाऱ्या मैत्रीणीच्या घरी जात होत्या. अमित नेरकर याने रंजना लांघे यांच्या बॅगेमध्ये विंचु असल्याचे सांगून त्यांना घाबरविले. त्यामुळे रंजना यांनी दागिने व महत्वाची कागदपत्रे असलेली आपल्या हातातील बॅग खाली टाकुन दिली. याचवेळी चोरट्या अमित नेरकर याने विंचु बाहेर काढण्याच्या बहाण्याने बॅग आपल्याकडे घेऊन त्याठिकाणावरुन पळ काढला. हा प्रकार पाहुन रंजना लांघे व त्यांच्या मैत्रिणींनी आरडा-ओरड केल्यानंतर त्या भागातील नागरिकांनी चोरट्या अमित नेरकर याचा पाठलाग करुन त्याला पकडले.

# पनवेल परिसरात वीज चोरीचे वाढते प्रकार; गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या काही महिन्यांपासून पनवेल परिसरात अनेक ठिकाणी वीजचोरीचे वाढते गुन्हे होत असून याबाबत सर्वच पोलिस ठाण्यात कारवाईच्या तक्रारी करण्यात आल्या असून त्यानुसार म.रा. वि.वि.चे अधिकारी व कर्मचारी गुन्हे दाखल करीत आहेत.



अनेक ठिकाणच्या राहत्या घरामध्ये फार्महाऊस, हॉटेल व इतर कंपन्या याठिकाणी बेकायदेशीररित्या किंवा युनिटची अनधिकृत वीज चोरी करून वीज वापरली जात आहे व शासनाची फसवणूक करण्यात येत आहे. याची माहिती म.रा.वि.वि.चे अधिकारी व कर्मचारी यांना मिळताच ते सदर ठिकाणी जाऊन अशा प्रकारे वीज चोरी करणाऱ्यांविरूद्ध संबंधित पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करीत आहे. अशा धडक कारवायांमुळे वीज चोरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# ट्रकने दिलेल्या धडकेत गाडीचे मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव ट्रकने पाठीमागून दुसऱ्या गाडीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात सदर गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

संपत सुर्यवंशी (वय-५५) हे त्यांच्या गाडीतून कुटूंबियांना घेऊन पनवेल-मुंब्रा हायवे रोड नावडे कॉलनी मार्गे डोंबिवली येथे जात असताना त्यांच्या गाडीस पाठीमागून येणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात सूर्यवंशी यांच्या गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.


राव साहेब कोर्ट

वकील : आर.एल.राऊत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१००६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२०२१

१) श्रीमती.जनाबाई दत्ताराम नाखवा
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अविनाश दत्ताराम नाखवा
वय : ४९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.विजय दत्ताराम नाखवा
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
(तिघेही रा.घर नं.५४०, कोंढरी पाडा,
करंजा, उरण, रायगड-४००७०२)
४) सौ.नंदिनी रमेश कोळी
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गुरुदेव सीएचएस, प्लॉट नं.१३ ए, रुम नं.बी.२०१,
कार्मेल शाळेजवळ, सेक्टर ८, कळंबोली, रायगड-४१०२१८
५) सौ.नुतन मच्छिंद्र कोळी
वय : ५२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.घर नं.३७६४, कोंढरी पाडा,
करंजा, उरण, रायगड-४००७०२ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार क्रं.१ ते ५ यांनी मयत कै.दत्ताराम उर्फ दत्तात्रय गोविंद नाखवा, यांचे दि.२१/०५/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, जिल्हा : रायगड येथे निधन झाले असून अर्जदारांनी मयताचे नावे सहहिस्सेदार/सहकब्जेदार म्हणून असलेल्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दिला आहे. सदर मयत कै.दत्ताराम उर्फ दत्तात्रय गोविंद नाखवा यांच्या नावे सहहिस्सेदार / सहकब्जेदार म्हणून असलेल्या भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | तालुका व जिल्हा | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.गुं.आणे |
|---|---|---|---|---|---|
| आंबेतरखार, रोडपाली | पनवेल, रायगड | ८७ | ४३७ | २४१ | २-१८-० |
| आंबेतरखार, रोडपाली | पनवेल, रायगड | ९२ | ४३७ | २४६ | २-३२-० |

तसेच वरील मिळकतीमधील मयत कै.दत्ताराम उर्फ दत्तात्रय गोविंद नाखवा, यांच्या नावे सहहिस्सेदार / सहकब्जेदार म्हणून येत असलेल्या १/१२ या हिश्श्यापोटीचे मुल्यांकन रक्कम रु.७,२४२/- (रुपये सात हजार दोनशे बेचाळीस मात्र) येत आहे.

ज्याअर्थी सदरहू अर्जदार क्रं.१ ते ५ हे मयत कै.दत्ताराम उर्फ दत्तात्रय गोविंद नाखवा, यांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य ती हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार क्रं.१ ते ५ यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास सदरहू मयताचे वरील मिळकतीचे वारस म्हणून वारस दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८ माहे ऑगस्ट २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील ॲड.सलमान पटेल

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०७३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०९/२०२१

१) श्री.अब्दुल्ला मोहम्मद हुसेन पटेल
२) कुमारी नरगीस अब्दुल्ला पटेल
३) श्री.नाजिश अब्दुल्ला पटेल
४) कुमारी यासमीन अब्दुल्ला पटेल
५) श्री.नाजीम अब्दुल्ला पटेल
६) श्री.साजीद अब्दुल्ला पटेल
७) कुमारी फरहीन अब्दुल्ला पटेल
सर्व रा.घर क्रं.९८५, सेक्टर क्रं.३०, ओवे गाव,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार क्रं.२ ते ७ यांची आई पै.परवीन अब्दुल्ला पटेल ही दि.१४/०२/२०२१ रोजी मौजे सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेली आहे. तसेच पै.परवीन अब्दुल्ला पटेल यांची सहहिस्सेदारांबरोबर मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील त्यांचे मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती / शेतजमिनी होत्या.

**मिळकत क्रं.१**
**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओवे | ११ | १५५ | १ | ०-०४-० |
| २ | ओवे | ११ | २५५ | १ | ०-३६-० |
| ३ | ओवे | ११ | २८६ | ३ क | ०-०४-० |
| ४ | ओवे | ११ | २९२ | १+२/२ | ०-२६-० |
| ५ | ओवे | ११ | २९२ | ४ | ०-४२-८ |
| ६ | ओवे | ११ | २९७ | ५ | ३-१६-० |
| ७ | ओवे | ११ | ३०८ | २ | ०-१७-० |
| ८ | ओवे | ११ | ३०८ | ५ | ०-१०-४ |
| ९ | ओवे | ११ | १५२ | २ | ०-४४-८ |
| १० | ओवे | ८० | ३७५ | ५ | ०-२६-० |
| ११ | ओवे | ३४२ | १५६ | ० | ०-५६-० |
| १२ | ओवे | ३४२ | २५४ | ५ | ०-५३-९ |
| १३ | ओवे | ३४२ | २५४ | ७ | ०-१८-७ |
| १४ | ओवे | ३४२ | २५४ | ११ | ०-३८-९ |
| १५ | ओवे | ३४३ | २९६ | ० | ०-२३-० |
| १६ | ओवे | ३४३ बी | २९३ | ५ अ | ३-१४-० |
| १७ | ओवे | ३४४ | ९ | १ | १०-८०-० |
| १८ | ओवे | ३४५ | ३४७ | ४ | ०-२४-९ |
| १९ | ओवे | ३४५ | ३४७ | १ | ०-०३-० |
| २० | ओवे | ३४५ | ३८२ | ५ | ०-०३-० |
| २१ | ओवे | ३४५ | ३८२ | २ पै | ०-५९-० |
| २२ | ओवे | ३४५ | ३४७ | २ पै | ०-१३-४ |
| २३ | ओवे | ३४६ | १०७ | १ | ४-४०-० |

**मिळकत क्रं.२**

**मौजे : ओवे खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ३५ जी, भूखंड क्रं.५ क्षेत्र, ४८४९.६९ चौ.मी. या भूखंडावर बांधण्यात आलेल्या साई स्प्रींग या इमारतीमधील, सदनिका क्रं.१००१ दहावा मजला क्षेत्र ४३.५०८ चौ.मीटर कारपेट क्षेत्र या वर्णनाची निवासी सदनिका फ्लॅट**

मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेली मिळकत क्रं.१ शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत. सबब सदर संपादीत मिळकतीबाबत व मिळकत क्रं.२ मधील सदनिका बाबत पै.परवीन अब्दुल्ला पटेल यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१८/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.मुजावर सो.

ॲड.तृप्ती ग. पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०००/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०९/२०२१

बाळु पदू चिखलेकर (मयत) यांचे तर्फे वारस
१) मंदा लक्ष्मण भगत, वय : ५६ वर्षे
रा.कळंबोली गाव, घर नं.२३५, सेक्टर १ ई,
भगत आळी, सद्गुरु बैठक हॉल जवळ,
ता.पनवेल, जि.रायगड
२) सुमन राम पाटील, वय : ६७ वर्षे
रा.नवभारत सोसायटी, फ्लॅट नं.B2-005,
प्लॉट नं.५ ते ८, सेक्टर २, नवीन पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

एकनाथ बाळु चिखलेकर (मयत) यांचे तर्फे वारस
१) भारती एकनाथ चिखलेकर, वय : ६० वर्षे
२) रुपेश एकनाथ चिखलेकर, वय : ३७ वर्षे
३) श्रीयश एकनाथ चिखलेकर, वय : ३५ वर्षे
वरील सामनेवाले क्र.१ ते ३
रा.गहनोट रेसिडेन्सी, प्लॉट नं.९८, सेक्ट १ (एस)
नवीन पनवेल, जि.रायगड
४) रुपाली अमोल म्हात्रे, वय : ४० वर्षे
रा.पुष्पकलश बिल्डींग, अे-विंग, फ्लॅट नं.२०१,
दुसरा मजला, बालाजी सिंफनी तपोवन जवळ,
सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ च्या (VIII) प्रमाणे, वारस दाखला मिळणेकरिता रक्कम रु.९७,९९४.४५/-

मे.कोर्टास अर्जदार तर्फे अर्ज विनंतीपूर्वक असा की,

१) अर्जदार यांनी सदरचा दिवाणी चौकशी अर्ज वारसदाखला मिळणेकरिता मे.कोर्टात दाखल केला आहे. अर्जदार व सामनेवाला हे मयत बाळु पदू चिखलेकर यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत बाळु पदू चिखलेकर हे दि.२१/१२/१९९५ रोजी मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार ह्या मयत बाळु पदू चिखलेकर यांच्या मुली आहेत व सामनेवाले यांचे वडील मयत एकनाथ बाळु चिखलेकर हा बाळु पदू चिखलेकर यांचा मुलगा होता. मयत एकनाथ बाळु चिखलेकर हे दि.२८/०५/२०२१ रोजी कोपरखैरणे-नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. अर्जदार व मयत एकनाथ बाळु चिखलेकर हे मयत बाळु पदू चिखलेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे. परंतु एकनाथ बाळु चिखलेकर हे मयत झाल्याने त्याचे मुलांना या अर्जामध्ये पक्षकार केलेले आहे.

२) अर्जाच्या निगडीत असलेली शेतजमीन मिळकत ही मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील आहे व होती. सदरची जमीन सन १९५७ साली ७/१२ चे महसूल रेकॉर्डमध्ये कसवणूक कुळ म्हणून कै.बाळु पदू चिखलेकर यांची होती व टेनन्सी कोर्टाने त्यांचेच नावे ३२-ग प्रकरणी, त्यांना कुळ-मालक म्हणून ठरविले आहे. कै.बाळु पदू चिखलेकर, रा.काळुंद्रे, ता.पनवेल यांनी स्वतः कुळ म्हणून सदरची मिळकत विकत घेतली होती व त्यांची मालकी, ताबा-कब्जा ही निर्वेध होता. व भूसंपादन झालेवर त्यांचे नावे ॲवॉर्ड झाले आहेत व होते. व या भूसंपादनामध्ये ते प्रकल्पग्रस्त झाले होते. तसेच या मिळकतीच्या मोबदल्यात त्यांना १२.५% टक्के भूखंड मिळणार आहेत.

३) सदरहू अर्जदार यांचे मयत वडील बाळु पदू चिखलेकर ह्यांचे मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असणाऱ्या खालील वर्णनाच्या काही जमीन मिळकती ह्या सरकारतर्फे सिडकोने नवी मुंबई योजनेकरिता भूसंपादन केलेल्या आहेत. त्या जमिनीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**जमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु. क्र. | मौजे काळुंद्रे युनिट केस नं. | सर्व्हे नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| १ | १०९ (१२९) | ६१/१ | ०=५५=० |
| २ | १०९ (१२८) डी | ६१/५ | ०=०३=० |
| ३ | १०९ (१२९) सी | ४०/४ | ०=४०=४ |
| ४ | १०९ (१२९) | ३९/२ | ०=२९=६ |
| ५ | १०९ (१२९) इ | ५३/६ | ०=३०=० |

बाळु पदू चिखलेकर यांच्या नावे भूसंपादीत झालेल्या मिळकतींतून सिडकोकडून संचिका क्र.५८ कडे मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील ता.१५/०३/२०१२ रोजीचे इरादापत्राने भूखंड दिले आहेत. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| संचिका क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र | सेक्टर |
|---|---|---|---|
| ५८ | १४ | ३५० चौ.मी. | ५-अे |
| | ३५ | १०५० चौ.मी. | |

येणेप्रमाणे जमीन मिळकती असून वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज १७/०८/२०२१ रोजी माझे सहीने व न्यायलयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.मुजावर सो.

ॲड.प्रशांत भुजबळ
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१०८५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०४/१०/२०२१

१) कु.बालाजी दशरथ थोरात
वय : २६ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) कु.अक्षय दशरथ थोरात
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.दशरथ निवृत्ती थोरात
वय : ४९ वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.रुम नं.१६२, दत्ताश्री को.ऑप.हौ.सोसायटी,
दत्त मंदिराजवळ, असल्फा गाव,
घाटकोपर (प.), मुंबई ४०००८४ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.दैवशाला दशरथ थोरात यांचे निधन दि.०४/१२/२०१८ रोजी झालेले आहे. कै.दैवशाला दशरथ थोरात यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**सदनिका नं.२०४, दुसरा मजला, ए-विंग, फ्युचर्स इन्क्लेव्ह सी.एच.एस.लि., भूमापन नं.४७९ ए/१, भूखंड नं.६ व ७, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**एकूण क्षेत्र ३५१.१२ चौ.फूट + इन्क्लोज बाल्किनी क्षेत्र ४४.७८ चौ.फूट सी.बी.क्षेत्र ७.४३ चौ.फूट एस.डी, २५ चौ.फूट व टेरेस ३१.00 चौ.फूट पैकी कै.दैवशाला दशरथ थोरात यांच्या अर्ध्या हिश्श्याचे क्षेत्र**

वरील मिळकत ही कै.दैवशाला दशरथ थोरात यांच्या मालकीची आहे. कु.बालाजी दशरथ थोरात वगैरे हे कै.दैवशाला दशरथ थोरात यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट कु.बालाजी दशरथ थोरात वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते कै.दैवशाला दशरथ थोरात यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१८/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**



श्री.भाकरे सो.कोर्ट

प्रोसेस जमा रु.५०/- अर्जदारातर्फे वकील ॲड.प्रसाद वाकडीकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ/कनिष्ठ स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०९६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/१०/२०२१

कै.वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत)
१) श्रीमती.नंदा वासुदेव पाटील
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रसाद वासुदेव पाटील
वय : ३१ वर्षे, धंदा : व्यवसाय
दोघेही राहणार : घर क्र.७२, मु.नावडे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
३) सौ.प्रतिभा संदेश म्हात्रे
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.१२८ (१४२), खारबाव रोड,
कालवार भिवंडी, दुंगे, तालुका : भिवंडी, जिल्हा : ठाणे
४) सौ.प्रतिक्षा सचिन वास्कर
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.५९, मु.कुंडेवहाळ,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत) यांचे दि.२४/०६/२०२१ रोजी वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले.

कै.वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत) यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या वडिलोपार्जित वारसाहक्कातील व स्वकष्टार्जित मालकीच्या अशा खालील मिळकती होत्या :-

**मिळकतींचे वर्णन**
**परिशिष्ट 'अ'**

| अ.क्र. | गाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नावडे ९२+९३ | १०६ | ८ | ०-०४-८ | ०.७५ |
| | | १०७ | २ | ०-१०-० | ०.६२ |
| २ | नावडे १७१ | ८ | ० | ०-२५-५ | ४.१९ |
| ३ | नावडे १७१ | ४९ | ३ अ | ०-३१-० | ५.५० |
| | | २७ | १ | ०-४३-१ | ५.९२ |
| | | २१८ अ | ३ | ०-०४-० | ०.०६ |
| | | ७४ | १ | ०-२१-८ | १.१६ |
| | | २७ | २ | ०-२७-८ | ४.८७ |
| ४ | नावडे १७१/अ | १७१ | ३ | ०-११-६ | १.८७ |
| | | १३ | ४ | ०-०३-० | ०.५६ |
| | | १८७ | ३ | ०-६५-३ | १२.३२ |
| | | १८३ | ० | १-०५-० | ७.६० |
| | | १७८ | ० | ०-६३-८ | ३.२३ |
| ५ | नावडे ११४ | २६१ | ० | १-१८-० | ६.३१ |
| ६ | नावडे ११५ | २१८ अ | २ | ०-७-० | ०.११ |
| | | २२२ | ० | ०-२-० | ०.४ |
| ७ | नावडे १२ | ७४ | १ अ | ०-०३-३ | ०.३२ |
| ८ | नावडे १७१ | २९ | ३ | १-२४-३ | ७.१७ |
| ९ | कळंबोली २८ | ३५ | ५ | ०-१४-० | ०.३७ |
| | | ४४ अ | २(PT) | ०-२-९ | ०.५ |
| १० | कळंबोली २८/अ | ७२ | १३ | ०-१६-० | ०.६६ |
| ११ | पेंधर ८६ | ६२ | - | १-२३-० | ५.०० |
| १२ | पेंधर ७५ ब | ७४ | ० | १-८९-२ | ११.२९ |
| | | ७५ | ० | २-२७-१ | ८.९४ |
| १३ | पेंधर ७५ अ-२५७ | ६९ | ४ | ०-०८-६ | १.१९ |
| | | ७२ | ० | ३-२८-५ | १२.७२ |
| | | ६७ | ४ | ०-१२-४ | २.०० |
| | | ७६ | ० | १-४१-४ | १२.१२ |

**परिशिष्ट 'ब'**

मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील मिळकती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | मालमत्ता क्र. | क्षेत्र (चौ.फुट/चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ७० | १८ × ३१ × २ |
| २ | ७२ | ३० × ३० × २ |
| ३ | २४० | १६० × २१ |
| ४ | २९६ | २० × ५५ |
| ५ | ६४४ | ४० × ५० × २ |

मयत कै.वासुदेव लक्ष्मण पाटील यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत) यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१८/०८/२०२१ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## महामार्ग पोलिस केंद्र वाकण यांच्यातर्फे हायवे मृत्युंजय दुत यांना स्ट्रेचर व रिफ्लैक्टर जॅकेटचे वाटप

**दै.रायगड नगरी । वाकण**

मुंबई-गोवा महामार्गावरिल महामार्ग पोलिस केंद्र वाकण यांच्यातर्फे हायवे मृत्युंजय दुत योजना या कार्यक्रमाअंतर्गत हायवे मृत्युंजय दुत यांना स्ट्रेचर, रिफ्लेक्टर जॅकेट व मेडिकल किटचे वाटप सोमवार दि. १६ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता ऐनघर चौकी येथे करण्यात आले. यावेळी महामार्गावर महत्वाची अशी भुमिका बजा-वणा-या हायवे मृत्युंजय दुत यांचा सत्कार देखील करण्यात आला. या कार्यक्रमाला ऐनघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच मनोहर सुटे, जिंदाल रुग्णालयातील डॉ. प्रिया भोईर, डॉ. सुयोग जवके, नागोठणे लायन्स क्लबचे विवेक सुभेकर, जितेंद्र धामणसे, वाकण महामार्ग पोलिस केंद्रातील पोलिस उपनिरीक्षक परशुराम भोईर, नामदेव वाघमारे, वाकण महामार्ग पोलिस केंद्रातील सर्व कर्मचारी, हायवे मृत्युंजय दुत, वाहनचालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी जिंदाल रुग्णालयातील डॉ.सुयोग जवके यांनी उपस्थित हायवे मृत्युंजय दुताना महामार्गावरील अपघातग्रस्तांना कशा प्रकारे मदत करावी त्याचप्रमाणे प्रथमोपचाराबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच ऐनघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच मनोहर सुटे, नागोठणे लायन्स क्लबचे विवेक सुभेकर यांनीही यावेळी मार्गदर्शन करत सर्व मृत्युंजय दुतांबद्दल गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन वाकण महामार्ग पोलिस केंद्रातील पोलिस उपनिरीक्षक परशुराम भोईर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महामार्ग वाकण केद्रांमधिल सर्व सहका-यांनी मेहनत घेतली.



### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# पालीत खड्ड्यांचे विघ्न ; नागरिक व वाहन चालक त्रस्त

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायकाचे स्थान असलेल्या बल्लाळेश्वराच्या पालीत रस्त्यांची खूप दुरवस्था झाली आहे. गावातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमधून मार्ग काढणे जिकरीचे झाले आहे. यामुळे नागरिकांसह वाहनचालक पुरते त्रस्त झाले आहेत.

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणे-शोत्सवात खराब रस्त्यामुळे भाविकांची व खरेदीसाठी पालीत येणाऱ्या नागरिकांची खूप गैरसोय होणार आहे. पाली स्टेट बँक पासून गांधी चौक, महावीर मार्ग ते थेट गणेश मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. आगरआळी, सावंतआळी, रामआळी ते मधल्या आळी पर्यंतचा रस्ता, भोई आळी, मिनिडोअर स्टँड ते बसस्थानक पर्यंतच्या रस्त्याची भल्या मोठ्या खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झाली आहे. त्याचबरोबर बल्लाळेश्वर नगर, धुंडीविनायक नगर व शिळोशी आणि मढाळी गावाकडे जाणारा रस्ता प्रचंड फुटला आहे. पावसाचे पाणी या खड्डयात साठल्याने वाहन चालकास खड्डयाचा अंदाज येत नाही. परिणामी वाहन जोरात खड्डयात आदळते. त्यामुळे पाणी व चिखल पादाऱ्यांच्या अंगावर उडते. खड्ड्यातील बारीक खडी पसरल्याने वाहने घसरतात.

दुचाकीस्वारांना चालतांना कसरत करावी लागते. पादचाऱ्यांना येथून मार्ग काढतांना अडचणी येतात. महिला व वृद्धांची तर खूपच गैरसोय होते. खड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होत आहे. प्रत्येकजण या खराब रस्त्याबद्दल संताप व्यक्त करत आहेत.

काही दिवसांपूर्वी येथील खड्ड्यात तात्पुरत्या स्वरूपात बारीक खडी टाकून खड्डे बुजविण्यात आले होते. मात्र सततचा पाऊस आणि वाहनांची रेलचेल यामुळे खड्ड्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. आता तरबहे खड्डे आणखी खोल व रुंद झाले आहेत.

> खड्यांमुळे नागरीक व वाहन चालकांची वाताहत होत आहे. पावसाळ्यापूर्वी रस्ते सुस्थितीत करणे आवश्यक होते. काही ठिकाणचे रस्ते कित्येक वर्षे दुरुस्त देखील झाले नाहीत. आगामी येणारे सण-उत्सव पाहता लवकर पालीतील रस्ते सुस्थितीत करणे गरजेचे आहे.



काही दिवसांपूर्वी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले होते. मात्र अतिवृष्टीमुळे पुन्हा खड्डे झाले. पालीतील रस्ते दुरुस्तीसाठी निधी आला आहे. पण पावसाळ्यात काम करता येणार नसल्याने ऑक्टोबर महिन्यात रस्ते नूतनीकरणाचे काम करण्यात येईल.
**दिलीप रायण्णावार, प्रशासक, नगरपंचायत, पाली**

**मोठ्या दंडाची भीती दाखवून केली जाते तोडपाणी ; पाचशे रूपये रोख घेऊन गाडी सोडली**

# वाशी टोलनाकाजवळील वाहतूक पोलीसांच्या वसुलीने वाहन चालक त्रस्त

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : कोरोनानी बहुतांश छोटे मोठे व्यवसाय पुर्ण पणे लयास गेलेले असताना नोकरी धंद्याचीही वाट लागली आहे अनेक युवकांची तर चक्क नोकरी दुरापास्त झाल्याने पोटाची खळगी भरण्याकरीता व आपल्या परीवाराचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी चक्क गाड्या भाड्याने चालविणे, भाजी विकणे, जो मिळेल तो धंदा सुरू करून पोट कसे भरेल यालाच प्रथम प्राधान्य दिल्याची हजारो उदाहरणे या कोरोनो काळात अनेकांनी पाहीली आहेत.



असाच एक रायगड गोरेगाव येथील तरूण युवक मुंबई येथुन आपल्या ताब्यातील इको मारूती व्हॅन घेऊन रायगड कडे येत असताना सदर युवकाला वाशी टोल नाक्याजवळील वाहतुक शाखेच्या एका कर्मचारी यानी हटकले व गाडी साईडला लाऊन लायसन्स मागितले. लायसन्स दाखविल्या नंतर गाडीचे पेपर्स मागीतले नंतर पीयुसी आहे का? विचारले अशा अनेक चौकशा केल्यावर त्याची गाडी आतुन तपासण्यात आली व आपण आर.टी.ओ. नियमाचा भंग करून गाडीतील बसण्याची आसन व्यवस्था बदली केली आहे. यामुळे आपणास किमान दोन हजाराच्या वर दंड ठोठावला जाऊ शकतो अशी भीती दाखविली गेली आधीच नोकरी व्यवसाय ठप्प झालेल्या तरूणाकडे इतके पैसे येतील कुठुन याचा सारासार विचार न करताच वाहतुक पोलीसाने सदर गाडी तेथेच थांबवुन ते पुढे जाऊ लागले परंतु ईको वाहन चालक इकडे तीकडे कावराबावरा होऊन मदतीची व ओळखीची वाट पाहु लागला. सदर वाहन चालकास त्या दरम्यान भुक देखील लागली होती परंतु ही समस्या सोडविल्या खेरीज तो पुढे जाऊ शकला नाही अखेर दोन हजार दोनशे वरून सदर तडजोड पाचशे रूपयावर मिटली व वाहतुक पोलीसांनी पाचशे रूपये घेऊन कोणतीही शासकीय दंडाच्या रकमेची पावती न देता सदर ईको गाडीच्या वाहन चालकास तेथुन सोडण्याकरीता हीरवा कंदील दाखविला अशा स्वरूपाच्या घटना या नवीमुंबई आयुक्तालय क्षेत्रातील वाहतुक शाखेच्या परीसरात अनेक वेळा घडत असल्याने तरूण सुशिक्षित वाहनचालक त्रस्त झालेले आहेत. याबाबत वाहतुक शाखेचे कर्तव्यदक्ष पोलीस उपायुक्त नविमुंबई यांनी वेळीच लक्ष घालुन वाहनचालकांना वेठीस धरणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी नोकरीला मुकलेले सुशिक्षित तरूण वाहनचालक करीत आहेत.

# ऑफलाईन सर्वसाधारण सभा घ्यावी : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२० ऑगस्ट रोजी होणारी सर्वसाधारण सभा ऑफलाईन घेण्याची मागणी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्ष नेते, प्रितम म्हात्रे यांनी आयुक्ताकडे केली आहे.



राज्य सरकारने नव्याने काढलेल्या कोविड अध्यादेशानुसार, बऱ्याच गोष्टींमध्ये शिथिलता बहाल केलेली आहे. रेल्वे, नाट्यगृह, मॉल्स ५०% क्षमतेने वा ज्यांचे लसीकरणाचे २ डोस पूर्ण आहेत, त्या नागरिकांकरिता खुले करण्यात आलेले आहे. तरी सदर नियमावलीप्रमाणे २० तारखेला आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणारी पनवेल महानगरपालिकेची महासभा, लसीकरणाचे २ डोस पूर्ण झालेल्या नगरसेवकांच्या उपस्थितीत किंवा सत्ताधारी पक्षातील संख्याबळाच्या ५० % नगरसेवक व विरोधी पक्षातील संख्याबळाच्या ५०% नगरसेवकांच्या उपस्थितीत व मुक्त वातावरणात संपन्न व्हावी अशी मागणी विरोधी पक्ष नेते, प्रितम म्हात्रे यानी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# हॉटेल व दुकानांना लावलेली जाचक अट रद्द करा

**रिपब्लिकन पक्षाची महानगरपालिकेकडे मागणी**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य सरकारने कोरोनाचे निर्बंध शिथिल करुन हॉटेल व्यावसायिकांना रात्री दहा वाजेपर्यंत हॉटेल सुरु ठेवण्याची परवानगी दिली असली तरी, दोन डोस घेतलेल्या कर्मचाऱ्यांनाच हॉटेलमध्ये कामावर ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अटीमुळे हॉटेल व्यावसायीक अडचणीत आल्यामुळे त्यांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाने सदर जाचक अट रद्द करावी, व एक डोस घेतलेल्या कामगारांना हॉटेलमध्ये कामावर ठेवण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली आहे.



राज्य सरकारने १५ ऑगस्टपासून करोना नियमांमध्ये शिथीलता आणून हॉटेल, मॉल व इतर दुकांनाना रात्री १० वाजेपर्यंत सुरु ठेवण्याची परवानी दिली आहे. मात्र ही परवानगी देतानाच सरकारने हॉटेल व दुकानांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी काही नियम लावले आहेत. लसीचे दोन डोस घेऊन चौदा दिवस पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांनाच दुकान व हॉटेलमध्ये कामास ठेवणे बंधनकारक केले आहे. दुकानांमध्ये काम करत असलेला बहुतांश कामगार वर्ग हा इतर राज्यातील असल्यामुळे त्यांना लस घेण्यात अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांचे लसीकरण होऊ शकलेले नाही. तसेच लसीचे दोन डोस घेण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागत असल्यामुळे दोन लस घेतलेल्या कर्मचाऱ्यांचा शोध घ्यायचा कुठे असा प्रश्न हॉटेल व इतर दुकानदारासमोर उभा ठाकला आहे.

राज्य सरकारने लागू केलेल्या या नियमामुळे हॉटेल व्यावसायिकांच्या व्यवसायावर त्याचा परिणाम असल्यामुळे राज्य शासनाने या नियमातून मध्यम मार्ग काढून एक डोस घेतलेल्या कामगारांना हॉटेलमध्ये काम करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी मागणी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने मंगळवारी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली. या शिष्टमंडळात रिपब्लिकन पक्षाचे सरचिटणीस एल.आर.गायकवाड, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष विजय कांबळे, नवी मुंबई उपाध्यक्ष टिळक जाधव, आयटी सेलचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सचिन कटारे, घणसोली विभाग कार्याध्यक्ष रवी गायकवाड, सागर कसबे, कुणाल कांबळे आदींसह कार्यकर्ते व व्यापारी उपस्थित होते. सदर प्रश्नावर लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन आयुक्त अभिजित बांगर यांनी शिष्टमंडळाला दिले.

# उरण मधील मधुबन कट्टा कोकण साहित्य परिषदेचे कविसंमेलन संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील कोकण मराठी साहित्य परिषद व मधुबन कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्यात १७ तारखेला कवी संमेलन भरविले जाते. या ऑगस्ट महिन्याच्या १७ तारखेलाही मुक्त वातावरणात ॲड. डी. के. पाटील यांच्या निवास स्थानी उरण येथे सुनाई कविसम्मेलन या रूपात मधुबन कट्टा जेष्ठ पत्रकार गणेश कोळी यांच्या अध्यक्षतेखाली जोशात बहरला.

यावेळी जेष्ठ साहित्यिक प्रा.एल.बी. पाटील, उरणचे माजी नगराध्यक्ष नगराजशेठ,कीर्तनकार एकनाथ पाटील, साहित्यिक अमृत पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.कवयित्री सुनंदा के.पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त उरण मधील प्रसिद्ध वकील डि.के.पाटील यांनी कवी संम्मेलनाचे आयोजन केले होते. सूत्रसंचालन रंजना जोशी केणी यांनी केले तर प्रास्ताविक प्रदीप पाटील यांनी केले.

कवयित्रीच्या पुण्यतिथीनिमित्त कविसम्मेलन घेऊन ऍड. डी. के. यांनी संस्कारी पायंडा घातला आहे. असा विचार आपल्या अध्यक्षीय भाषणात गणेश कोळी मांडला. कविसम्मेलनात अमृत पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, रायगडभूषण किशोर पाटील, रंजना केणी, भ.पो. म्हात्रे,संजीव पाटील, अजय शिबकर, संजय होळकर, चेतन भोईर, एकनाथ म्हात्रे, संपदा



पाटील, प्रा.अशोक खातू, मनोज उपाध्ये, संजय ठाकुर, अनंत पाटील, शिवप्रसाद पंडित आदी २१ कवींनी आई, निसर्ग, प्रेम, भक्ती, राजकारण, शेती इत्यादी विषयांवर कविता सादर केल्या. शेवटी आभार प्रदर्शन मच्छिंद्र घरत यांनी केले.

# गुरुवारी स्व. लक्ष्मणशेठ पाटील यांची सर्वपक्षीय शोकसभा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मणशेठ जोमा पाटील (म्हात्रे) आणि त्यांचे पुत्र भाजप कार्यकर्ते अविनाश (नावडे, ता. पनवेल) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी पनवेल तालुका भाजपच्या वतीने गुरुवारी (दि. १९) सायंकाळी ०४ वाजता आगरी समाज मंडळाच्या पनवेल शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली आहे.



नावड्याचे लक्ष्मणशेठ पाटील (म्हात्रे) हे पनवेल तालुक्यातील बडे प्रस्थ आणि भाजपचे ज्येष्ठ नेते होते. प्रेमळ, मनमिळावू, मितभाषी आणि हसतमुख स्वभावाचे लक्ष्मणशेठ यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. तत्पूर्वी त्यांची पत्नी जनाबाई यांचे, तर त्यानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र अविनाश यांचेही निधन झाले. या तिहेरी आघातामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर एकापाठोपाठ एक दुःखाचे डोंगर कोसळले. काही दिवसांच्या अंतराने आई, वडील आणि मुलगा यांचे निधन झाल्याने नावड्यासह पनवेल तालुका हळहळला.


स्व. लक्ष्मणशेठ पाटील (म्हात्रे) आणि त्यांचे पुत्र स्व. अविनाश यांना आदरांजली वाहण्यासाठी पनवेल तालुका भाजपच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली असून, या वेळी उपस्थित राहण्याचे आ-वाहन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे यांनी केले आहे.

# दागिन्यांच्या दुकानातून आठ लाख रुपयांचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**सीवूड्स येथील ग्रँड सेंट्रल मॉल मधील टायटन मिया बाय तनिष्क या दागिन्यांच्या दुकानात कामाला असलेल्या एका कामगाराने दुकानातील सुमारे पावणे आठ लाख रुपयांच्या गोल्ड क्काईन व रोख रक्कमेचा अपहार करुन पलायन केल्याची घटना उघडकिस आली आहे. श्यामराव गोळे असे या कर्मचाऱ्याचे नाव असून एनआरआय पोलिसांनी त्याच्या विरोधात अपहारासह चोरीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.**

या प्रकरणातील तक्रारदार साहिल गुफ्ता हा एसजीबीएल इंडिया लि. या कंपनीचा डायरेक्टर असून त्याच्या कंपनीचे सीवूड्स मधील ग्रँड सेंट्रल मॉलमध्ये टायटन आय प्लस व टायटनची मिया बाय तनिष्कच्या दागिन्यांचे दुकान आहे. जानेवारी २०20 मध्ये या दुकानात कामगाराची आवश्यकता असल्याने या कंपनीने कामगाराची शोधा-शोध सुरु केली होती. त्यावेळी टायटन कंपनीने शामराव गोळे याची माहिती कंपनीला पाठवुन दिली होती. त्यामुळे गुफ्ता याने गोळे याला आपल्या दुकानात सेल्समन म्हणून कामाला ठेवले होते. दरम्यानच्या काळात या दुकानाच्या मॅनेजरने काम सोडल्याने गुफ्ता याने त्याच्या जागी गोळे याला मॅनेजर केले. सदर दुकानात कामाला असलेल्या महिलेने देखील काम सोडल्यानंतर लॉकडाऊन लागल्यामुळे गुफ्ता यांनी दुसरे कामगार न ठेवता, एकटय़ा श्यामराव गोळे या एकटय़ावर दुकानाची जबाबदारी सोपविली.



याचाच फायदा उचलत शामराव गोळे याने टायटनच्या शोरुममध्ये आलेले सोन्याच्या कॉईनमधील बारा क्काईनची चोरी केली. त्याचप्रमाणे कुठल्याही ग्राहकाने सात गोल्ड क्काईन दुकानात आणून दिलेले नसताना श्यामराव गोळे याने कुणाला काहीही माहिती न देता, परस्पर दुकान उघडून ग्राहकाने दुकानात गोल्ड क्काईन आणून दिल्याचे भासवून याबाबतची नोंद सिस्टीममध्ये केली.

तसेच सदर क्काईन परत आल्याचे टायटन कंपनीला कळवुन कंपनीकडून स्वत:च्या अकाऊंटवर पैसे मागवुन घेतले. त्याचप्रमाणे त्याने दुकानाच्या काऊंटरवर जमा झालेली ३१ हजाराची रक्कम देखील चोरली. अशा पद्धतीने श्यामराव गोळे याने दुकानातील सुमारे पावणे आठ लाख रुपयांचा अपहार करुन पलायन केल्याने कंपनीचे डायरेक्टर गुफ्ता यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात पार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी श्यामराव गोळे याच्या विरोधात अपहार व चोरीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.